

# कामाच्या ठिकाणी स्त्रिया

आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**
All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे "ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी" हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Women in the Workplace)

# कामाच्या ठिकाणी स्त्रिया

# अनुक्रमणिका


1. स्त्रियांस कामाच्या ठिकाणी असणे योग्य आहे काय? 1
2. कार्यस्थळातील स्त्रिया कुटूंब, कार्य आणि स्वतःचे आत्मिक जीवन कसे संतुलित करू शकतात? 11
3. स्त्रिया कामाच्या ठिकाणची आव्हाने कशी हाताळतात? 17
4. दुहेरी-उत्पन्न कुटुंबाचे नुकसान—ते कसे टाळावे 22

# 1
# स्त्रियांस कामाच्या ठिकाणी असणे योग्य आहे काय?

जेव्हा मी प्रथम “कामाच्या ठिकाणी स्त्रिया” या विषयावर बोलण्याचा विचार केला तेव्हा माझी पत्नी एमी हिने मला विचारले, “आपण या विषयावर बोलण्यास पात्र आहात असे आपल्याला का वाटते?” मी उत्तर दिले, “माझा दृष्टीकोन सोपा आहे! मी उत्पत्ति ते प्रकटीकरणापर्यंत पवित्र शास्त्राचा अभ्यास करणार आहे, त्या विषयावर पवित्र शास्त्र काय म्हणते ते शोधून श्रोत्यांसमोर मांडणार आहे.” तर, मी येथे जे काही सांगत आहे ते माझ्या स्वतःच्या अनुभवातून नव्हे तर पूर्णपणे वचनांच्या माझ्या अभ्यासातून आले आहे. या विषयाकडे पवित्र शास्त्राच्या आधारे दृष्टीकोन ठेवून आपण आपल्या जीवनात ते लागू करायला शिकू या!

स्त्रियांचे कामाच्या ठिकाणी असणे योग्य आहे काय? यावर लोकांची मते वेगवेगळी आहेत. काही म्हणतात, “होय” तर काहीजण म्हणतात, “नाही! स्त्रियांनी घरीच रहावे आणि बाहेर जाऊ नये.” लोक आपली मते स्पष्ट करण्यासाठी पवित्र शास्त्राचा संदर्भ घेऊ शकतात. परंतु यावर पवित्र शास्त्राद्वारे दृष्टीकोन घेऊ या.

## स्त्रियांबद्दल पवित्र शास्त्राद्वारे दृष्टीकोन

**उत्पत्ति 2:18**
**मग परमेश्वर देव बोलला, “मनुष्य एकटा असावा हे बरे नाही; तर त्याच्यासाठी अनुरूप साहाय्यक मी करीन.”**

स्त्रीची निर्मिती का झाली? देवाने स्त्रीला दोन सोप्या कारणास्तव

उत्पन्न केले—पुरुषाची साथीदार आणि साहाय्यक व्हावी म्हणून. ती त्याची "अनुरूप साहाय्यक" होणार होती. इब्री भाषेत याचा अर्थ, "विरुद्ध भाग" किंवा "अनुरूप भाग." तर, स्त्री पुरुषाचा गौण भाग बनण्यासाठी नाही तर ती त्याचा समकक्ष—बरोबरीचा भाग होण्यासाठी निर्माण केली गेली आहे. पुरुष आणि स्त्री अशा प्रकारे बरोबरीचे घडविले गेले. म्हणून, स्त्री आणि पुरुष यांच्यातील नातेसंबंध हे हेतुपूर्वक परस्परसंबंधित असावे. ते एकमेकांचे "जोडीदार व सहकारी" होणार होते. परंतु मनुष्याच्या पतनाच्या वेळी हे सर्व बदलले.

**उत्पत्ति 3:16**
**तो स्त्रीला म्हणाला: "मी तुझे दुःख व तुझे गर्भधारण बहुगुणित करीन; तू क्लेशाने लेंकरें प्रसवशील; तरी तुझा ओढा नवऱ्याकडे राहील; आणि तो तुझ्यावर स्वामित्व चालवील."**

परमेश्वराने आरंभी पुरुष आणि स्त्रीला समतुल्य बनण्यासाठी घडविले, परंतु पतनाच्या दिवसापासून ती स्त्री पुरुषाच्या अधीन झाली, तिच्या पतीकडे तिची इच्छा आणि ओढा राहिला आणि तो तिच्यावर स्वामित्व गाजवू लागला. अशाप्रकारे, पतनामुळे, आज आपण पतित जगात आहोत जेथे पुरुषाचे वर्चस्व आहे. ही पतितावस्था आहे आणि परमेश्वराचा हेतू हा नव्हता. पण चांगली बातमी अशी आहे की मुक्तीच्या वेळी ख्रिस्ताने स्त्रीला पुन्हा पुरुषाच्या बरोबरीचे केले. ख्रिस्तामध्ये पुरुष किंवा स्त्री नाही. *"यहूदी व हेल्लेणी, गुलाम व स्वतंत्र, पुरुष व स्त्री, हा भेदच नाहीं; कारण तुम्ही सर्वजण ख्रिस्त येशूच्या ठायीं एकच आहा"* (गलतीकरांस पत्र 3:28).

स्त्री आणि पुरुष दोघेही आता जीवनरूपी कृपादानाचे समाईक वतनदार (ग्रीकमध्ये "सोबतीचे भागीदार") आहेत.

**1 पेत्र 3:7**
**पतींनो, तसेच तुम्हीहि आपल्या स्त्रियांबरोबर, त्या अधिक नाजूक पात्र आहेत म्हणून सुज्ञतेने सहवास ठेवा; तुम्ही उभयतां जीवनरूपी कृपादानाचे समाईक**

**वतनदार आहां, म्हणून तुम्ही त्यांना मान द्या; म्हणजे तुमच्या प्रार्थनांत व्यत्यय येणार नाही.**

पुरुषाने आता समजून घेतले पाहिजे की स्त्री आता देवाच्या गोष्टींमध्ये बरोबरीचा भाग आहे. तथापि, मुक्ती न पावलेल्या पतीत जगामध्ये आपण अजूनही प्रामुख्याने पाहतो की पुरुष वर्चस्व गाजवतो. जगाची पूर्णपणे सुटका झालेली नाही आणि म्हणूनच ही रचना जशीच्या तशी आहे.

## पवित्र शास्त्रातील स्त्रिया

परमेश्वराच्या वचनाच्या अभ्यासानुसार, आम्हाला असे आढळून आले आहे की इतिहासात परमेश्वराने स्त्रियांचा त्यांच्या घराच्या बाहेर वेगवेगळ्या क्षमतांमध्ये उपयोग केला आहे.

उदाहरणांची यादी:

### *मरियम संदेष्टी*

**निर्गम 15:20**
**मग अहरोनाची बहीण मिर्याम संदेष्ट्री हिने हाती डफ घेतला आणि सर्व स्त्रिया डफ घेऊन तिच्या मागून चालल्या.**

## स्त्रियांनी निवासमंडपाच्या बांधणीत मदत केली

**निर्गम 35:22,25,26**
**22 ज्यांना मनापासून इच्छा झाली, ते सगळे स्त्री पुरुष आले, आणि त्यांनी नथा, कुंडले, मुद्रिका, कंकणे असे सोन्याचे सर्वप्रकारचे दागिने आणले, ह्याप्रकारे प्रत्येक मनुष्याने परमेश्वरासाठी सोन्याचे अर्पण आणले.**
**25 ज्या स्त्रिया सुबुद्ध हृदयाच्या होत्या त्या सर्वांनी निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाचे सूत कातले आणि ते कातलेले सूत व आपल्या हाताने विणलेले तलम सनाचे कापड त्यांनी आणले.**
**26 आणि ज्या स्त्रियांच्या अंतःकरणात स्फूर्ति होऊन त्यांना बुद्धि झाली त्या सर्वांनी बकऱ्याचे केस कातले.**

## स्त्रियांस देवाचे वचन शिकविले जावे अशी परमेश्वराची इच्छा होती

**अनुवाद 31:12**
**सर्व लोकांना म्हणजे पुरुष, स्त्रिया, बालके आणि तुझ्या नगरांतला उपरी ह्यांना जमव म्हणजे ते ऐकून शिकतील आणि तुमचा देव परमेश्वर ह्याचे भय धरतील आणि ह्या नियमशास्त्रांतली सर्व वचनें काळजीपूर्वक पाळतील.**

### *दबोरा*

दबोरा संदेष्टी ही इस्राएलची न्यायाधीश सुद्धा होती (शास्ते 4:4).

### *याएल*

याएल ही गृहिणी होती जिने एका माणसाच्या डोक्यात खिळा ठोकून इस्राएलला पराक्रमी विजय मिळवून दिला (शास्ते 4:21).

### *यरूशलेमच्या तटबंदीच्या पुनर्बांधणीसाठी परमेश्वराने स्त्रियांचा उपयोग केला*

**नहेम्या 3:12**
**त्याच्या शेजारी यरूशलेम जिल्ह्याच्या अर्ध्या भागाचा अधिकारी शल्लूम बिन हल्लोहेश व त्याच्या कन्या यांनी डागडुजी केली.**

### *एस्तेर*

एस्तेर ही राणी होती जिने देवाच्या लोकांस मुक्ती मिळवून दिली.

### *स्त्रिया येशूची सेवा करीत*

नवीन करारात, आपण येशूची सेवा करणाऱ्या स्त्रियांबद्दल वाचतो.

**मार्क 15:41**
**तो गालीलात असतांना ह्या त्याच्याबरोबर जात व त्याची सेवा करीत असत; ह्यांच्याशिवाय त्याच्याबरोबर यरूशलेमेस आलेल्या दुसऱ्या पुष्कळ स्त्रिया होत्या.**

**लूक 8:1-3**
**1 पुढे लवकरच असे झाले की, तो उपदेश करीत व देवाच्या राज्याची सुवार्ता सांगत नगरोनगरीं व गांवोगांवीं फिरत होता; तेव्हां त्याच्याबरोबर ते बारा प्रेषित**
**2 आणि दुष्ट आत्मे आणि विकार ह्यांपासून मुक्त केलेल्या अशा कित्येक स्त्रिया, म्हणजे ज्या मग्दालीया म्हटलेल्या मरीयेंतून सात भुतें निघालीं होतीं ती,**
**3 आणि हेरोदाचा कारभारी खुजा ह्याची बायको योहान्ना, तसेच सुसान्ना व दुसऱ्या पुष्कळ स्त्रिया होत्या; त्या आपल्या पैशाअडक्याने त्यांची सेवाचाकरी करीत असत.**

## *लुदिया*

**प्रेषितांची कृत्ये 16:14**
**तेथे लुदिया नांवाची कोणीएक स्त्री होती; ती थुवतीरा नगरची असून जांभळीं वस्त्रे विकीत असे; ती देवाची भक्ति करणारी होती. तिने आमचे भाषण ऐकले; तिचे अंतःकरण प्रभूने असे प्रफुल्लित केले की पौलाच्या सांगण्याकडे तिने लक्ष दिले.**

फिलिप्पै येथे लुदिया ही व्यावसायिक महिला जांभळ्या वस्त्रांची व्यापारी होती. परमेश्वराने फिलिप्पै येथे तिचे घर मंडळीची स्थापना करण्यासाठी उघडून तिचा उपयोग केला. *"मग ते बंदिशाळेंतून निघून लुदियेच्या घरीं गेले, बंधुजनांस भेटून त्यांनीं त्यांना धीर दिला आणि तेथून ते मार्गस्थ झाले"* (प्रेषितांची कृत्ये 16:40).

## *अक्विला आणि प्रिस्किल्ला*

**प्रेषितांची कृत्ये 18:1-4**
**1 त्यानंतर तो अथेनै सोडून करिंथास गेला.**
**2 तेव्हां पंत येथील अक्विल्ला नांवाचा कोणीएक यहूदी त्याला आढळला. सर्व यहूद्यांनीं रोम शहर सोडून जावे अशी क्लौद्यानें आज्ञा केल्यामुळें तो आपली**

**बायको प्रिस्किल्ला हिच्यासह इटालीहून नुकताच आला होता; त्याच्याकडे तो गेला.**
**3 आणि त्यांचा व ह्याचा व्यवसाय एक असल्यामुळें तो त्यांच्याजवळ राहिला आणि त्यांनीं मिळून तो चालविला; त्यांचा व्यवसाय राहुट्या करण्याचा होता**
**4 तो दर शब्बाथ दिवशीं सभास्थानांत वादविवाद करून यहूद्यांची व हेल्लेण्याची खात्री करून देत असे.**

अक्किला आणि प्रिस्किल्ला हे तंबू तयार करणारे होते—एक व्यावसायिक जोडपे जे पौलाच्या सेवेचे भागीदार होते. कमीत कमी इतर तीन ठिकाणी, पौलाने त्याचा सहकारी म्हणून त्यांचा उल्लेख केला आहे (रोमकरांस पत्र 16:3; 1 करिंथ 16:19; 2 तीमथ्य 4:19).

## *फीबी, युनिया आणि इतर स्त्रिया*

**रोमकरांस पत्र 16:1-7**
**1 किंख्रियांतील मंडळीची सेविका-आमची बहीण फीबी-हिची मी तुम्हांला शिफारस करितों;**
**2 अशासाठीं कीं, तुम्हीं पवित्र जनांस योग्य असा तिचा प्रभूमध्यें स्वीकार करावा, आणि ज्या ज्या कामांत तिला तुमची गरज लागेल त्यांत तिला साहाय्य करावे; कारण ती स्वतः पुष्कळ जणांस व मलाहि साहाय्य करणारी अशी झाली आहे.**
**3 ख्रिस्त येशूमध्यें माझे सहकारी, प्रिस्क व अक्किला ह्यांना सलाम सांगा;**
**4 त्यांनीं माझ्या जिवाकरितां आपला जीव धोक्यांत घातला, त्यांचे आभार केवळ मीच मानितों असें नव्हे तर पराष्ट्रीयांच्या सर्व मंडळयाही मानितात.**
**5 जी मंडळी त्यांच्या घरी जमत असते तिलाहि सलाम सांगा; माझा प्रिय अपैनत ह्याला सलाम सांगा; तो ख्रिस्तासाठी आशिया देशाचे प्रथम फळ आहे.**
**6 मरीयेला सलाम सांगा; तिने तुमच्यासाठीं फार श्रम केले आहेत.**
**7 माझे नातेवाईक व सोबतीचे बंदिवान् अंद्रोनीक व युनिया ह्यांना सलाम सांगा; ते प्रेषितांमध्ये नामांकित आहेत व माझ्यापूर्वीच ते ख्रिस्तामध्ये होते.**

फीबी, एक डिकन होती जी मंडळीच्या काही व्यवसायांची प्रमुख होता. युनिया ही एक स्त्री प्रेषित पौलाबरोबर सहकर्मी होती. पौलाबरोबर सेवेत सहभागी इतरही काही स्त्रिया होत्या, ज्यांस त्याने

*"... ह्या ज्या स्त्रियांनी माझ्याबरोबर सुवार्तेच्या कामी श्रम केले ..."* (फिलिप्पैकरांस पत्र 4:3) म्हणून संबोधिले.

परंपरागत घरगुती वातावरणाच्या बाहेर परमेश्वराने स्त्रियांचा उपयोग करून त्यांस आपल्या कामात कसे सामील केले याचे हे एक विहंगावलोकन आहे.

## स्त्रीचे प्राथमिक पाचारण

पवित्र शास्त्र अगदी स्पष्टपणे सांगते आहे की स्त्रीचे प्राथमिक पाचारण म्हणजे तिच्या पतीची पत्नी, मुलांची आई आणि घराची देखभाल करणारी हे आहे.

**1 तीमथ्य 5:14**
**म्हणून माझी इच्छा अशी आहे की, तरूण विधवांनी लग्न करावे, मुलें प्रसवावी, घर चालवावे आणि विरोधकाला निंदा करण्यास निमित्त सांपडू देऊ नये.**

"घर चालविणे" (ग्रीक *'ओइकोडेस्पोटेओ'*) = कुटूंबाची प्रमुख असणे (म्हणजे, नियम), घराचे संचालन करणे.

**तीत 2:4,5**
**4 त्यांनी तरुण स्त्रियांना असे शिक्षण द्यावे की, त्यांनी आपल्या नवऱ्यांवर व मुलाबाळांवर प्रेम करावे;**
**5 त्यांनी मर्यादशील, शुद्धाचरणी, घरचे काम पाहणाऱ्या, मायाळू, आपापल्या नवऱ्याच्या अधीन राहणाऱ्या, असे असावे, म्हणजे देवाच्या वचनाची निंदा होणार नाही.**

"घरचे काम पाहणाऱ्या" (ग्रीक *'ओइकोरोस'*) *'ओइकोस' वरून* (वासस्थान, घर, कुटूंब) आणि *'उरोस'* (रक्षक).

म्हणून, *'ओइकोरोस'*= घरी राहणारी, अर्थात घरगुती प्रवृत्तीची (उत्तमप्रकारे "घर चालविणारी"), घर चालविणारी.

स्त्रीला आपल्या घरातील कामकाज सांभाळावे लागेल आणि घरात पुढारी व्हावे लागेल. ती येथे समतोल कसा साधते? एखाद्या स्त्रीने बाहेरील, कामाच्या ठिकाणी गुंतलेले असणे योग्य आहे काय? उत्तर “होय“ आहे.

## कामाच्या ठिकाणी स्त्रियांची स्थिती

- पवित्र शास्त्रामध्ये कोठेही स्त्रिया कामाच्या ठिकाणी नसाव्यात हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही. पवित्र शास्त्राच्या स्पष्टीकरणात, पवित्र शास्त्रामध्ये एखाद्या गोष्टीला विरोध नसल्यास, त्याचा अर्थ असा आहे की परमेश्वर आपल्याला इतर संबंधित शास्त्रवचनांद्वारे ठरवलेल्या हद्दीत योग्य निर्णय घेण्याची परवानगी देतो.

उदाहरणार्थ, परमेश्वर म्हणाला, “मी तुमचा आरोग्य देणारा परमेश्वर आहे,” परंतु त्याने औषधे घेण्याचे किंवा डॉक्टरकडे जाण्याचे टाळण्यास सांगितले नाही. पण काहींनी याचा चुकीचा अर्थ लावला आहे. बरे होण्यासाठी आपण परमेश्वराकडे पाहण्याची गरज आहे, परंतु आपण आजारी असताना औषधे घेणे किंवा डॉक्टरकडे जाणे चुकीचे नाही. तशाच प्रकारे, देव म्हणाला की स्त्रीचे प्राथमिक पाचारण म्हणजे तिच्या पतीसाठी पत्नी, तिच्या मुलांसाठी आई असणे आणि घराची देखभाल करणे होय. परंतु स्त्रीने व्यवसायात सहभागी होऊ नये, असे त्यांनी म्हटले नाही. म्हणून पवित्र शास्त्राचा चुकीचा अर्थ लावता कामा नये.

- कृपेची भेट लोकांना स्त्री आहे की पुरुष हे न पाहता दिली जाते.

**रोमकरांस पत्र 12:6-8**

**6 आपल्याला प्राप्त झालेल्या कृपादानांप्रमाणे आपल्याला निरनिराळी कृपादाने आहेत, म्हणून ईश्वरी संदेश सांगायचा असल्यास आपण तो आपल्या विश्वासाच्या प्रमाणाने सांगावा;**

**7 सेवा करताना सेवेत तत्पर असावे, शिकवणाऱ्याने शिक्षण देण्यात,**

**[8] बोध करणाऱ्याने बोध करण्यात तत्पर असावे, दान देणाऱ्याने ते औदार्याने द्यावे, अधिकाऱ्याने आपले काम आस्थेने करावे, दया करणाऱ्याने ती संतोषाने करावी.**

अशा स्त्रिया असतील ज्यांच्याकडे नेतृत्व, प्रशासन, अध्यापन, भविष्यवाणी आणि उत्तम आर्थिक क्षमता असतील. ह्या देणग्या लिंगाच्या आधारे दिल्या गेलेल्या नाहीत. ही कृपादाने चालवण्याची शक्यता असलेल्या जागांपैकी एक म्हणजे घराच्या बाहेर, कामाच्या ठिकाणी असेल.

नीतिसूत्रे 31 मध्ये, स्त्रीचे वर्णन घरातल्या तिच्या कौशल्यांबद्दलच नाही तर ती तिच्या घराबाहेरच्या कार्यातही गुंतलेली असल्याचे दिसून आले आहे, त्यातील काही स्पष्टपणे तिच्या व्यवसायात तिच्या सहभागी होण्याचे सूचक आहेत. याचे कारण असे की परमेश्वराने तिला ते करण्याचे कृपादान दिले आहे.

**नीतिसूत्रे 31:16,19,24**
**[16] शेताची चौकशी करून ते ती विकत घेते; ती आपल्या हातच्या कमाईने द्राक्षांचा मळा लावते.**
**[19] ती चाती आपल्या हाती घेते, ती हातांनी चरकी धरते.**
**[24] ती तागाची वस्त्रे करून विकते, व्यापाऱ्यांना कमरबंद विकत देते.**

- काही परिस्थितीत पुरुषाने कुटुंबाप्रती आपली जबाबदारी सोडली असेल.

हे पित्याच्या अनुपस्थितीत किंवा पती नसल्यावर आहे. अशा परिस्थितीत, जर त्या स्त्रीकडे मुलांची काळजी घेण्याची जबाबदारी असल्यास, पुढाकार घेणे, बाहेर जाणे, पैसे मिळवणे, मार्गदर्शन करणे आणि घराचे व्यवस्थापन करणे इत्यादींचे स्वातंत्र्य तिला आहे. आपण तिला पौलाची ही सूचना देऊ शकत नाही, *"म्हणून माझी इच्छा अशी आहे की, तरुण विधवांनी लग्न करावे, मुले प्रसवावीत, घर चालवावे आणि विरोधकाला निंदा करण्यास निमित्त सापडू*

*देऊ नये"* (1 तीमथ्य 5:14) आणि तिने घरीच राहावे आणि त्यांना कावळ्यांकडून खायला मिळावे अशी अपेक्षा करू शकत नाही!

- अशा परिस्थितीत आर्थिक कारणांमुळे ते आवश्यक असू शकते.

जर पती घरी असेल आणि काम करत नसेल किंवा जर तो करीत असलेली कमाई घरासाठी पुरेशी नसेल तर त्या महिलेला बाहेर जाऊन आर्थिक मदत करण्यासाठी काम करावे लागेल आणि घराचे व्यवस्थापनही करावे लागेल.

## मनन

1) एखाद्या स्त्रीने कामाच्या ठिकाणी असणे योग्य आहे याचा आपण कसा निष्कर्ष काढाल?

# 2
# कार्यस्थळातील स्त्रिया कुटूंब, कार्य आणि स्वतःचे आत्मिक जीवन कसे संतुलित करू शकतात?

कुटूंब, काम आणि स्वतःचे आत्मिक जीवन संतुलित करणे हे पुरुषांपेक्षा श्रमिक स्त्रियांसाठी मोठे आव्हान ठरते. पुरुष कामावरून घरी परततात आणि त्यांची सेवा केली जाण्याची अपेक्षा करतात. परंतु काम करणारी स्त्री केवळ बाहेर जाऊन नोकरी करत नाही तर घरी परत येते आणि आपल्या पती आणि मुलांची सेवा करण्यासाठी पुन्हा काम करते.

## परमेश्वर एक व्यक्ती म्हणून स्त्रीस मूल्यवान समजतो

स्त्रियांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की परमेश्वर त्यांच्या स्त्री होण्याचा विचार न करता व्यक्ती म्हणून त्यांस मूल्यवान जाणतो. उत्पत्ति 3:16 नुसार मानवजातीच्या पतनातचा एक शाप म्हणजे स्त्रीची इच्छा तिच्या पतीकडे असेल. त्याचा परिणाम म्हणून, प्रत्येक स्त्री तिची ओळख म्हणून तिच्या पतीकडे पहात असते. ती त्याचे आडनाव देखील चालवते. तिचे संपूर्ण विश्व, इतकेच काय तिचे स्वतःचे मूल्य देखील त्याच्यापासून आलेले दिसते.

स्त्रियांनो, तुम्ही प्रत्येकाने आपल्या पतीवरून आपली नजर हटवून परमेश्वराकडे आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे कारण तो व्यक्ती म्हणून तुम्हास मूल्यवान जाणतो. आपली इच्छा परमेश्वराकडे असणे आवश्यक आहे. आपल्या योग्यतेसाठी आणि ओळखीसाठी त्याच्याकडे पहा.

**गलतीकरांस पत्र 3:28**
**यहूदी व हेल्लेणी, गुलाम व स्वतंत्र, पुरुष व स्त्री, हा भेदच नाही; कारण तुम्ही सर्व जण ख्रिस्त येशूच्या ठायी एकच आहात.**

परमेश्वराच्या राज्यात लिंगभेद नाही. मुक्ति पावलेले आणि आशीर्वाद, अभिषेक, कृपादान, पाचारण, आणि परमेश्वराद्वारे दिलेली सेवादाने या बाबतीत स्त्री आणि पुरुष दोघेही समान आहेत.

**1 करिंथ 11:3,11,12**
**3 प्रत्येक पुरुषाचे मस्तक ख्रिस्त आहे; स्त्रीचे मस्तक पुरुष आहे, आणि ख्रिस्ताचे मस्तक देव आहे, हे तुम्हांला समजावे अशी माझी इच्छा आहे.**
**11 तरी प्रभूमध्ये पुरुष स्त्रीपासून वेगळा नाही आणि स्त्री पुरुषापासून वेगळी नाही.**
**12 कारण जशी स्त्री पुरुषापासून तसा पुरुष स्त्रीच्या द्वारे आहे, आणि सर्वकाही देवापासून आहे.**

ज्या अर्थाने एक पुरुष स्वेच्छेने स्वतःला ख्रिस्ताच्या अधिपत्याखाली आणतो, किंवा ज्याप्रमाणे ख्रिस्ताने पित्याशी समतुल्य असूनही, पृथ्वीवर असताना स्वेच्छेने स्वतःला पित्याच्या इच्छेनुसार आज्ञाधारक बनवले, त्याचप्रमाणे, एक स्त्री देखील स्वेच्छेने स्वतःला माणसाच्या नेतृत्वाखाली. आणू शकते, याचा अर्थ असा नाही की ती कोण आहे आणि ती जे काही करते ते तिला पुरुषापेक्षा कनिष्ठ दर्जा देते. पुरुष आणि स्त्री प्रभूमध्ये परस्पर अवलंबून आहेत (1 करिंथ 11:11). आणि पुरुष आणि स्त्री दोघेही त्यांचे जीवन, ओळख आणि इतर सर्व गोष्टी परमेश्वराकडून प्राप्त करतात!

## आपल्या पहिल्या प्रेमास आलिंगन द्या

स्त्रियांनो, तुमचे पहिले प्रेम तुमचा पती **नाही!** आपले प्राथमिक लक्ष परमेश्वरासोबतचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण करणे आहे.

**लूक 10:38-41**
**38 मग ते पुढे जात असता तो एका गावात आला; तेव्हा मार्था नावाच्या एका स्त्रीने त्याचे आपल्या घरी स्वागत केले.**
**39 तिला मरीया नावाची एक बहीण होती; तीही प्रभूच्या चरणांजवळ बसून त्याचे भाषण ऐकत राहिली.**
**40 तेव्हा मार्थेला फार काम पडल्यामुळे तिची तारांबळ उडाली आणि ती पुढे येऊन म्हणाली, "प्रभूजी, माझ्या बहिणीने माझ्या एकटीवर कामाचा भार टाकला आहे, ह्याची आपल्याला पर्वा नाही काय? मला साहाय्य करायला तिला सांगा."**
**41 प्रभूने तिला उत्तर दिले, "मार्थे, मार्थे, तू पुष्कळ गोष्टींविषयी काळजी व दगदग करतेस."**

या परिच्छेदात, मार्था एक विशिष्ट गृहिणीचे प्रतीक आहे, ती सर्व स्वयंपाक करते आणि येशूची सेवा करण्यावर लक्ष केंद्रित करते. पण येशू तिला सांगतो की विसावा घे, त्याच्या पायाशी बस आणि मरीया जे करीत आहे ते कर. स्त्रियांनो, तुम्ही "मार्था" बनण्यापूर्वी आपले प्राधान्य "मरीया" बनण्यास द्यावे अर्थात, याचा अर्थ असा नाही की तुम्ही "मरीया" बनू शकता आणि तुम्ही येशूच्या पायाशी बसत असताना तुमच्या पतीला घरातील काम करण्यासाठी "मार्था" बनवू शकता! ते आपल्या जबाबदारीत अपयशी होणे ठरेल. आपण दोन्ही केले पाहिजे.

## पत्नी, आई आणि गृहिणी म्हणून आपले प्राथमिक पाचारण स्वीकार करा आणि पूर्ण करा

बऱ्याच कामकाजी स्त्रियांसाठी हे एक मोठे आव्हान असू शकते. कार्यालयात स्त्रियांना त्यांच्या कामासाठी दर महिन्याच्या अखेरीस पैसे दिले जातात आणि त्यांना काही बक्षिसे, मान्यता किंवा बढती मिळते, ज्यामुळे त्यांना कर्तृत्वाची जाणीव होते. दुसरीकडे, घरी, स्त्रियांना यापैकी काहीही मिळत नाही. परंतु जर स्त्रिया या प्राथमिक पाचारणामध्ये अयशस्वी झाल्या, तर कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्याचे काही मोल ठरणार नाही.

**टीप:** साहजिकच, जर आपण विवाहित नसलात तर हे आपणास अद्याप लागू होणार नाही. किंवा जर आपण वयोवृद्ध असाल तर ही एक गोष्ट आपण आधीच पूर्ण केली असेल.

## ख्रिस्ताच्या देहात आपल्या पाचारणाचा स्वीकार करा

स्त्रियांनो, कामाच्या ठिकाणी आपले पाचारण स्वीकार करण्यापूर्वी आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की ख्रिस्ताच्या देहात प्रत्येक स्त्रीला स्थान आहे. स्त्रिया त्याकडे दुर्लक्ष करतात किंवा विसरून जातात आणि कामावर धाव घेतात. ख्रिस्ताच्या शरीरात आज अनेक हरवलेल्या माता आहेत. ज्या स्त्रिया तरुण स्त्रियांसाठी ईश्वरभक्तीचा आदर्श म्हणून समजल्या जातात, त्या परमेश्वराच्या घरात नाहीशा झाल्या आहेत कारण त्या बाहेर कामात व्यस्त आहेत. ख्रिस्ताच्या देहात प्रत्येक स्त्रीची ईश्वर-नियुक्त सेवा आहे. ख्रिस्ताच्या शरीरात आपले कार्य शोधा आणि पूर्ण करा!

## कामाच्या ठिकाणी तुमचे पाचारण स्वीकारा

ज्या स्त्रियांस कार्यस्थळी पाचारण करण्यात आले आहे त्या कामाच्या ठिकाणी त्यांच्या पाचारणाचा स्वीकार करून, अंगीकार करून आणि ते पाचारण पूर्ण करून परमेश्वराच्या राज्यात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.

## व्यावहारिक निर्देश

- **आपले हृदय कोठे आहे हे समजून घ्या**. जर आपले हृदय घरात समाधानी असेल तर तेथे काहीही चुकीचे नाही. जर आपल्या हृदयाला कामाच्या ठिकाणी एखादा ठसा उमटवायचा असेल तर कदाचित आपण या गोष्टीचा विचार केला पाहिजे.
- **आपली कृपादाने व पाचारण समजून घ्या.** परमेश्वराने आपणास कामाच्या ठिकाणासाठी प्रशिक्षित केले आहे काय, कृपादान दिले

आहे काय? तर मग देवाने आपल्याला जे सोपवले आहे ते वाया घालवू नका.

- **आपले प्राधान्य जाणून घ्या.** हे जरी खरे असेल की आपल्या अंतःकरणात कामाच्या ठिकाणी आपणास ठसा उमटवायची इच्छा असेल आणि कदाचित तसे करण्याचे कृपादान देखील आपणास प्राप्त झाले असेल, तरीही हे शक्य आहे की काही काळपर्यंत आपले प्राधान्य आपल्या मुलांना असेल. ते लहान असताना विशेषेकरून हे खरे ठरेल. आपण त्यागपूर्ण भावनेने आपल्या जीवनाचा तो काळ कामाच्या ठिकाणी पाऊल टाकण्याऐवजी आपल्या मुलांत गुंतवू शकता.
- **आपल्या मर्यादा जाणून घ्या.** आपण न मोडता किती पुढे ताणू शकतो याबद्दल आपल्यातील प्रत्येकाची वेगळी क्षमता आहे. आपल्याला आपल्या मर्यादा माहित असणे आवश्यक आहे. पत्नी, आई, गृहिणी आणि कामाच्या ठिकाणी असलेली स्त्री असणे खूप आव्हानात्मक असू शकते. आपल्याकडे वाढण्याची क्षमता असल्यास—जा! अन्यथा, आपल्या मर्यादेत रहा!

जर आपणास कामाच्या ठिकाणी पाचारण करण्यात आले असेल तर त्याविषयी दोषी वाटून घेऊ नका कारण परमेश्वराने आपणास कृपादान आणि कृपाही दिली आहे. याचा अर्थ हा आहे की आपण कामाच्या ठिकाणी असावे अशी त्याची इच्छा आहे. म्हणून या संधीचा उपयोग करून घ्या. जर आपणास गृहिणी म्हणून पाचारण असेल तर आपण केवळ “पत्नी” आणि “आई” आहोत, “व्यवस्थापक” किंवा “सीईओ” नाही. म्हणून स्वतःला हीन किंवा कनिष्ठ दर्जाचे समजू नका. जर आपण आपल्या पहिल्या प्रीतीचा स्वीकार करता—परमेश्वराचा, आणि आपल्या प्राथमिक पाचारणाचा, तर आपले प्रतिफळ मोठे असेल. कारण तो आपणास एवढेच काय ते मागत आहे. फक्त लक्षात ठेवा, यापैकी प्रत्येकास आपल्या जीवनासाठी परमेश्वराच्या वैयक्तिक

पाचरणाचा, त्याच्या वैयक्तिक इच्छेचा स्वीकार करावयाचा आहे.

# मनन

1) प्रभूपासून आपले जीवन आणि ओळख प्राप्त करण्यासाठी स्त्री कोणत्या गोष्टींचा स्वीकार करू शकते?

# 3
# स्त्रिया कामाच्या ठिकाणची आव्हाने कशी हाताळतात?

## ताण

हा विभाग पुरुष आणि स्त्रिया दोघांनाही लागू आहे. घरी आणि कामाच्या ठिकाणी दोन्ही जबाबदाऱ्या असल्यामुळे आपल्या सर्वांनाच तणाव आहे. मी आपल्या स्वतःच्या जीवनाचे उदाहरण देऊ इच्छितो, मला घर व चर्च दोन्ही ठिकाणचे व्यवस्थापन करावे लागते, अशावेळी तणावमुक्त करण्यात आणि दबावाचा सामना करण्यात दोन गोष्टींनी माझी मदत केली आहे.

### *1) प्रभूवर अवलंबून राहण्यास शिकणे*

**यशया 26:3**
**ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्याला तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुझ्यावर असतो.**

"कठीण परिस्थिती" चे अस्तित्व न नाकारता आणि त्यावर अवलंबून न राहता, आपला परमेश्वर जो त्यापेक्षा मोठा आहे त्यावर अवलंबून राहिले पाहिजे. तो राजा आहे जो वादळांवर प्रभुत्व करतो आणि म्हणून, लाटा आणि वादळांवरअवलंबून न राहता, जेव्हा आपण त्या राजाकडे वर पाहण्याचा निर्णय घेतो जो त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे, तेव्हा तो आपल्याला परिपूर्ण शांततेत ठेवतो. कधी कधी मी आपली शांती गमावून बसतो आणि तणावग्रस्त होतो,  पण मी त्या स्थितीत जास्त काळ राहत नाही. मी परत पूर्वस्थितीत येतो आणि आपले लक्ष प्रभूकडे लावतो जो वादळापेक्षा श्रेष्ठ आहे.

## *2) परमेश्वराच्या वचनावर मनन करण्यास शिकणे*

वचनावर मनन करणे हे एक उत्तम ताण-निवारक आहे. जर एखादी गोष्ट आपल्या जीवनात मोठा तणाव आणि दबाव उत्पन्न करीत असेल, तर या परिस्थितीविषयी परमेश्वराच्या वचनावर विचार करा आणि जेव्हा आपण असे कराल तेव्हा त्याचे वचन आपणास भीतीऐवजी विश्वासाने भरून टाकते. भीती ताण उत्पन्न करते. विश्वास आत्मविश्वास उत्पन्न करतो, तणावमुक्त आणि शांतचित्त राहण्यात आपली मदत करतो.

## स्पर्धा

- निष्पक्ष स्पर्धा चांगली गोष्ट आहे.

जेव्हा आपण 100 मीटरची शर्यत धावता, आपण नव्याने जन्मलेले, आत्म्याने भरलेले, अन्यान्य भाषा बोलणारे, भूते काढणारे ख्रिस्ती असलात तरीही आपण शर्यतीत इतर प्रतिस्पर्ध्यांचा हात धरून शर्यतीत धावण्याची अपेक्षा करू शकत नाही! आपल्याला अगदी सुरुवातीपासून शेवटच्या रेषेपर्यंत आपले सर्वोत्तम देणे आवश्यक आहे. निष्पक्ष स्पर्धा सर्वोत्तम बाहेर आणते. त्याचप्रमाणे कामाच्या ठिकाणी स्पर्धात्मक असणे योग्य आहे. परंतु हे योग्य मार्गाने करावे आणि आपल्या प्रतिफळासाठी देवाकडे पहावे.

**कलस्सै 3:22-24**

**22 दासांनो, तुम्ही सर्व गोष्टींत आपल्या व्यवहारातल्या धन्यांच्या आज्ञा पाळा, माणसांना संतोषवणाऱ्या नोकरांसारखे तोंडदेखल्या चाकरीने नका; तर सालस मनाने प्रभूची भीती बाळगून पाळा.**

**23 आणि जे काही तुम्ही करता ते माणसांसाठी म्हणून करू नका तर प्रभूसाठी म्हणून जिवेभावे करा.**

**24 प्रभूपासून वतनरूप प्रतिफळ तुम्हांला मिळेल हे तुम्हांला माहीत आहे. प्रभू ख्रिस्ताची चाकरी करत जा.**

- कामाच्या ठिकाणी प्रामाणिक आणि नैतिक मार्गाने स्पर्धा करण्यात काहीही चूक नाही. प्रामाणिकपणाचा विजय होतो!

## पुरुष प्राधान्य आणि लिंग पक्षपातीपणा

अनेक संस्थांचा असा अलिखित कायदा असतो की ते केवळ पुरुषांना बढती देतात. अनेक स्त्रियांना या पक्षपाताचा अनुभव करावा लागतो. तसेच, एकाच पदावर असलेल्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे वेतन दिले जात नाही. जर आपण अशा परिस्थितीत असाल तर भांडू नका. फक्त परमेश्वराकडे पहा आणि लक्षात ठेवा की पदोन्नती त्याच्याकडूनच येते आणि परमेश्वर आपल्या हाताच्या कामास यश देण्यास सक्षम आहे. एखाद्याला आपल्या मार्गातून कसे काढावे हे त्याला माहित आहे जेणेकरून आपणास बढती मिळू शकेल.

**स्तोत्रसंहिता 75:6,7**
**6 कारण उन्नती ही पूर्वेकडून नव्हे, पश्चिमेकडून नव्हे, व अरण्याकडूनही नव्हे;**
**7 तर न्याय करणारा देव आहे; तो एकाला खाली पाडतो व दुसऱ्याला वर चढवतो.**

## लैंगिक प्रस्ताव

आपण अशा परिस्थितीत स्वतःला पाहत आहात का जेथे आपण आपल्या अधिकाऱ्याला लैंगिक मान्यता केल्याशिवाय आपली बढती होण्याची शक्यता नाही? जेव्हा त्या क्षेत्रात वाकण्याचा दबाव येत असेल तेव्हा स्थिर उभे रहा आणि म्हणा, **"नाही!"** वाकू नका किंवा तडजोड करू नका. पवित्र रहा. शुद्ध रहा. जे विवाहित आहेत त्यांनी आपल्या पतीशी एकनिष्ठ राहावे, मग काहीही का होईना.

- आपल्या कामाच्या ठिकाणी परमेश्वर आपला रक्षक आहे.

**स्तोत्रसंहिता 3:3**
**तरी हे परमेश्वरा, तू माझ्याभोवती कवच आहेस; तू माझे गौरव आहेस, माझे**

**डोके वर करणारा आहेस.**

**स्तोत्रसंहिता 27:1**
**परमेश्वर माझा प्रकाश व माझे तारण आहे; मी कोणाची भीती बाळगू? परमेश्वर माझ्या जिवाचा दुर्ग आहे मी कोणाचे भय धरू?**

- शालीन वस्त्रे घाला, उत्तेजित करणारी वस्त्रे घालू नका आणि सभ्यतेने वागा.

**तीत 2:4,5**
**4 त्यांनी तरुण स्त्रियांना असे शिक्षण द्यावे की, त्यांनी आपल्या नवऱ्यांवर व मुलाबाळांवर प्रेम करावे.**
**5 त्यांनी मर्यादशील, शुद्धाचरणी, घरचे काम पाहणाऱ्या, मायाळू, आपापल्या नवऱ्याच्या अधीन राहणाऱ्या, असे असावे, म्हणजे देवाच्या वचनाची निंदा होणार नाही.**

## व्यवसायाची निवड

काही स्त्रिया इव्हेंट्स मॅनेजमेंट, करमणूक, फॅशन डिझायनिंग आणि यासारख्या व्यवसायांमध्ये सामील असतात. आजूबाजूला पाप आहे म्हणून आपण अशा व्यवसायांपासून दूर पळण्याची गरज नाही. आपणास हे आवडो, किंवा न आवडो हे दुष्कृत्य जवळजवळ सर्वच उद्योगांत आणि कंपन्यांमध्ये आढळून येते. येशूने आम्हाला जगात राहण्यास सांगितले, त्यापासून पळून जाऊ नका. आपल्या व्यवसायातही हे तत्व लागू करा.

**योहान 17:14-18**
**14 मी त्यांना तुझे वचन दिले आहे; जगाने त्यांचा द्वेष केला, कारण जसा मी जगाचा नाही तसे तेही जगाचे नाहीत.**
**15 तू त्यांना जगातून काढून घ्यावेस अशी विनंती मी करत नाही, तर तू त्यांना वाइटापासून राखावे अशी विनंती करतो.**
**16 जसा मी जगाचा नाही तसे तेही जगाचे नाहीत.**
**17 तू त्यांना सत्यात समर्पित कर; तुझे वचन हेच सत्य आहे.**
**18 जसे तू मला जगात पाठवलेस तसे मीही त्यांना जगात पाठवले.**

जर आपला व्यवसाय आपल्याला आपला विश्वास, आचरण, चारित्र्य, सद्‌गुण आणि सत्यनिष्ठतेशी तडजोड करण्यास भाग पाडत असेल तर आपल्याला त्या पदापासून दूर करून घ्यावे लागेल आणि त्या उद्योगात दुसऱ्या स्थानावर जावे लागेल. येशूप्रीत्यर्थ आणि आपल्या विश्वासात उभे रहा. बदल घडवून आणा. आपल्या संस्थेतील बदलाचे प्रतिनिधित्व करा.

लोक जेथे आहेत तेथे परमेश्वराला आपली गरज आहे, कारण त्यांच्याशी बोलण्यासाठी आपला आवाज, त्यांच्यावर हात ठेवण्यासाठी आपले हात आणि त्यांच्यावर प्रेम प्रदर्शित करण्यासाठी आपल्या जीवनाची त्याला गरज आहे. तर, वातावरण नैतिकदृष्ट्या आव्हानात्मक असले तरीही तेथे रहा आणि बदल घडवा. तथापि, अशा वातावरणाचा प्रभाव न पडता त्यावर प्रभाव टाकण्यासाठी तुम्ही आध्यात्मिकदृष्ट्या मजबूत आहात याची खात्री करा.

## मनन

1) एक स्त्री या नात्याने तुमच्या कामाच्या ठिकाणी येणाऱ्या सामान्य आव्हानांवर तुम्ही कशी मात करू शकता ते आठवा.

# 4
# दुहेरी-उत्पन्न कुटुंबाचे नुकसान—ते कसे टाळावे

जेव्हा पती-पत्नी दोघेही कामाच्या ठिकाणी गुंतलेले असतात तेव्हा काही धोके किंवा समस्या उद्भवतात:

## धोके

### *परस्पर निर्भरतेऐवजी स्वतंत्रता आणि आत्मनिर्भरता*

जेव्हा पती-पत्नीचे वैयक्तिक बँक खाते, कार, क्रेडिट कार्ड इत्यादी असतात तेव्हा ते एकत्र येण्याऐवजी अधिक स्वतंत्र होतात.

### *जोडीदारांमधील स्पर्धा*

एकाच उद्योगात काम करणाऱ्या योग्यतापात्र पती-पत्नी पगाराच्या आणि पदांच्या बाबतीत तुलना आणि स्पर्धा होऊ लागते.

### *कार्यस्थळाशी विवाह करणे*

काही जोडीदार वेदीवर "मी करतो" असे म्हणून एकमेकास वचन देतात आणि दुसऱ्या दिवशी कामाच्या ठिकाणी जाऊन "मी हेसुद्धा करतो" असे म्हणतात. ते आपला सर्व वेळ कामावर घालवतात आणि त्यांच्या कामाच्या ठिकाणाशी लग्न करतात!

### *जास्त पैसे पण कमी वेळ*

महत्त्वाच्या गोष्टी एकत्र करण्यासाठी तुम्हाला अधिक पैसे हवे आहेत की

अधिक वेळ हवा आहे? या क्षणी, जोडीदाराने निवड करणे आवश्यक आहे. अशा काही गोष्टी आहेत ज्या पैशाने कधीही विकत घेता येत नाहीत. पैसा आम्हाला एक उत्कृष्ट जोडीदार किंवा चांगली मुले विकत घेऊन देऊ शकत नाही. एकत्र वेळ घालविल्याने एका उत्तम वैवाहिक जीवनाची निर्मिती होते. मुलांना चांगल्याप्रकारे शिकवले जाते, संगोपन केले जाते आणि प्रशिक्षण दिले जाते.

## *अति काम करणाऱ्या स्त्रिया*

दुहेरी उत्पन्न कुटुंबात, हे शक्य आहे की स्त्री घराच्या आत आणि बाहेर दोन्ही ठिकाणी काम करते आणि परिणामी तिला जास्त काम आणि थकवा येतो. हे महत्वाचे आहे की जेव्हा पती-पत्नी दोघेही कामाच्या ठिकाणी गुंतलेले असतात तेव्हा पतीनेही घरगुती जबाबदाऱ्यांचा भार उचलला पाहिजे जेणेकरून पत्नीला जास्त काम करणे भाग पडू नये.

## दुहेरी-उत्पन्न कुटुंबासाठी कारवाईचे उपाय

## *खरे मूल्य समजून घ्या*

आपण संपूर्ण जग मिळविले आणि आपले घर, कुटूंब आणि मुले गमावल्यास, आपण खरे मूल्य गमावले आहे. आमच्या दिवसांतील काही अत्यंत प्रशंसनीय उद्योगपती म्हणजे घटस्फोटित, दुसरे आणि तिसरे लग्न केलेले लोक आहेत. त्यांनी कदाचित उद्योगात बदल घडवून आणले असतील, मोठी महामंडळे स्थापन केली असतील आणि जगविख्यात असतील, परंतु त्यांचे कौटुंबिक जीवन विष्कळीत झाले आहे. मग आपल्या मनात विचार येतो की फक्त लग्न म्हटल्या जाणाऱ्या “संस्थेस” ज्यात फक्त एक पत्नी होती ते का सांभाळू शकले नाहीत! त्यांना स्वतःचे घर सांभाळता आले नाही, ही दुःखाची गोष्ट आहे. आपल्यासाठी सर्वात मौल्यवान काय आहे याची निवड करणे जरूरी आहे—जगाने प्रशंसा करण्याऐवजी —उत्तम वैवाहिक जीवन

आणि धार्मिक मुले.

## *वेळेचा समतोल साधण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा*

जरी आव्हाने व दबाव खूप मोठे असले तरीही आपला वेळ आणि शक्ती योग्यप्रकारे वितरित करण्यासाठी जाणीवपूर्वक आणि सतत प्रयत्न केले पाहिजेत—परमेश्वरासोबत वेळ, घरी वेळ, परमेश्वराच्या मंदिरात वेळ आणि कामाच्या ठिकाणी वेळ. एमी मला याची सतत आठवण करून देते आणि मी नेहमी यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो.

## *दोघांच्या शक्तीचा विकास करा*

**उपदेशक 4:9-12**
**9 एकट्यापेक्षा दोघे बरे; कारण त्यांच्या श्रमांचे त्यांना चांगले फळ प्राप्त होते.**
**10 त्यांच्यातला एक पडला तर त्याचा सोबती त्याला हात देईल; पण जो एकटा असून पडतो त्याला हात देण्यास कोणी नसते; त्याची दुर्दशा होते.**
**11 दोघे एकत्र निजले तर त्यांना ऊब येते; एकट्याला ऊब कशी येईल?**
**12 जो एकटा असतो त्याला कोणी माणूस भारी झाला तर त्याचा प्रतिकार दोघांना करता येईल; तीनपदरी दोरी सहसा तुटत नाही.**

जेव्हा दोनची शक्ती असते, तेव्हा दुप्पट शक्ती असते आणि आपण दुप्पट यश मिळवण्यास सक्षम असतो. जर पती-पत्नी सर्व क्षेत्रात एकत्र येऊ शकतात, तर प्रत्येक जण एकट्याने असे करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा, एकत्रितपणे ते बरेच काही आणखी प्रयत्न करून प्राप्त करू शकतात, पुढे वाढू शकतात, आणि उच्च पातळीवर पोहोचू शकतात. पतींनीसुद्धा घरी आपली भूमिका पूर्ण करण्यास शिकले पाहिजे, विशेषतः जेव्हा बायका बाहेर नोकरी करतात तेव्हा.

आमच्या स्वतःच्या जीवनात, ॲमी वैद्यकीय डॉक्टर म्हणून प्रशिक्षित आहे आणि तिची पदव्युत्तर पदवी घेत होती, तरीही आमची मुले मोठी होईपर्यंत तिने तिची व्यावसायिक कारकीर्द बाजूला ठेवण्याची

विचारपूर्वक निवड केली. हे सोपे नव्हते, खरे तर कधीकधी खूप वेदनादायक होते. तथापि, जेव्हा दोन्ही मुले पूर्ण दिवस शाळेत जाऊ लागली तेव्हा ॲमीने हळूहळू परत आपल्या जागी काम करावयास सुरूवात केली. तिला पूर्ण खात्री झाली होती की तिने आपले कर्तव्य पार पाडले आहे आणि जेव्हा तिला आपल्या मुलांसाठी तिची सर्वात जास्त गरज भासली तेव्हा तिने त्यागही केला.

## मनन

1) आपण कोणती पावले उचलण्यास सक्षम आहात ज्यामुळे आपल्याला दुप्पट-उत्पन्न असलेल्या कुटुंबांना येणाऱ्या सामान्य अडचणी टाळण्यास मदत होईल?

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक तातातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"*** **(रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"*** **(प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"*** **(रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# विषयी ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक / भावनिक अडचणी** |
| **शिक्षेतील उणीव** | **तणाव/आघात** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **आध्यात्मिक समस्या** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "All Peoples Church" बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**


## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play







*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌त कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो


**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

स्त्रियांचे कामाच्या ठिकाणी असणे योग्य आहे काय? यावर लोकांची मते वेगवेगळी आहेत. काही म्हणतात "होय" तर काही म्हणतात, "नाही! स्त्रियांनी घरीच राहावे व बाहेर जाऊ नये." लोक आपली मते स्पष्ट करण्यासाठी पवित्र शास्त्राचा संदर्भ घेऊ शकतात.

बायबल अगदी स्पष्टपणे सांगते की स्त्रीचे प्राथमिक पाचारण म्हणजे तिच्या पतीची पत्नी, मुलांची आई आणि घराची देखभाल करणारी आहे. परंतु त्याने असे म्हटले नाही की स्त्री व्यवसायात गुंतणार नाही. परमेश्वराच्या वचनाच्या अभ्यासानुसार आम्हाला असे आढळून आले आहे की इतिहासात परमेश्वराने स्त्रियांचा त्यांच्या घराच्या बाहेर वेगवेगळ्या क्षमतांमध्ये उपयोग केला आहे. बायबलमध्ये कोठेही स्त्रिया कामाच्या ठिकाणी नसाव्यात हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही. बायबलच्या स्पष्टीकरणात, बायबलमध्ये एखाद्या गोष्टीला विरोध नसल्यास त्याचा अर्थ असा आहे की परमेश्वर आपल्याला इतर संबंधित शास्त्र वचनांद्वारे ठरवलेल्या हद्दीत योग्य निर्णय घेण्याची परवानगी देतो.

स्त्रियांनो, लोक जेथे आहेत तेथे परमेश्वराला आपली गरज आहे कारण त्यांच्याशी बोलण्यासाठी आपला आवाज, त्यांच्यावर हात ठेवण्यासाठी आपले हात, आणि त्यांच्यावर प्रेम प्रदर्शित करण्यासाठी आपल्या जीवनाची त्याला गरज आहे. म्हणून आपल्या कामाच्या ठिकाणी बदल घडवून आणा जेथे परमेश्वराने आपणास ठेवले आहे.



**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org